# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ६४९५ /२०१९, पुणे शहर, दिनांक- ०३/०८/२०१९

**विषय - दिनांक ०५/०८/२०१९ रोजी, नागपंचमी उत्सवानिमित्त दगडीनागोबा मंदिर गणेश पेठ, पुणे येथील रोडच्या वाहतूक व्यवस्थेतील बदला बाबत.**

------------oo------------

नागपंचमी उत्सवानिमीत्त दिनांक ०५.०८.२०१९ रोजी, सकाळी ०६.०० वा. पासून दगडी नागोबा मंदिर,गुरुद्वारा शेजारी,गणेशपेठ पुणे येथे दर्शनासाठी नागरीकांची मोठ्याप्रमाणात गर्दी होत असते, त्यावेळी सदर भागातील वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक- ०५/०८/२०१९ रोजी,सकाळी ०६.०० वा. ते रात्री २२.०० वा.पर्यंत देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक या मार्गावरील वाहतुक बंद ठेवण्यात येणार असून त्याबाबत आदेश निर्गमित करीत आहे.

- **बंद मार्ग-** देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक.

- **पर्यायी मार्ग-** दारुवाला पुल चौकातून उतारा चौक-गणेश दुधभट्टी- डुल्या मारुती चौक - हमजेखान चौक मार्गे इच्छितस्थळी जाणे.

तरी वाहनचालक नागरीकांनी आपली गैरसोय टाळण्यासाठी मिरवणूक मार्गावर न येता पर्यायी मार्गांचा अवलंब करावा.